स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक **20–08–2010** रोजी दुपारी **12–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप दिवाकर जोशी** | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. अरुणा जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 3. | श्री. रवींद्र डोळस | सदस्य |
| 4. | श्री. दिपक चौधरी | सदस्य |
| 5. | श्रीमती ममता ठाकुर | सदस्या |
| 6. | श्री. दिपक पटेल | सदस्य |
| 7. | श्री. शेषराव गोतमारे | सदस्य |
| 8. | श्रीमती शोभा पटेल | सदस्य |
| 9. | श्री. सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 10. | श्री. दिपक दयाराम पेंदाम | सदस्य |
| 11. | श्री. किशोर गजभिये | सदस्य |
| 12. | श्री. संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 13. | श्री. मधुकर नत्थुजी कांबळे | सदस्य |
| 14. | श्री. सतिश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 15. | श्री. राजेश रामचरण जरगर | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. राजेश श्रीनिवास माटे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. विष्णुपद बुटे, अपर आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

ठराव क्रमांक 105 :– वॉर्ड क्र. 65, मधील वारजूरकर, यांच्या घराजवळ, तहसील पोलीस स्टेशन आणि ज्योतीनगर परिसरातील डांबरीकरणाचे कामास्तव मे. ओ.जी. बजाज, यांची प्राकलनिय दरापेक्षा 10.33 टक्के कमी दराच्या रु. 12,22,083/– राशीच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 106 :– वॉर्ड क्र. 96, हिवरी नगर येथे नागनदीवर पुलाचे बांधकामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 83,07,205/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 107 :– वॉर्ड क्र. 34, येथील येंडलवाडी म.न.पा. शाळेची सुरक्षा भिंत बांधणे व दुरुस्ती करणे व आयब्लॉक बसविणे तसेच मैदानाचा विकास करण्याकरिता मे. लोटस कन्स्ट्रक्शन यांचे मंजूर निविदादरावर उर्वरित कामास्तव रु. 4,88,904/– च्या राशीसाठी पद क्र. 159 नविन (जुना पद क्र. 203) सन 2010–11 मधील उपलब्ध तरतूदीतून कार्यादेश मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 108 :– वॉर्ड क्र. 78, येथील गांधीसागर तलावाच्या सभोवताल असलेल्या रेलींग व इतर बाबींचे दुरुस्ती व देखभाल करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 10,09,612/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 109 :– वॉर्ड क्र. 128, येथे महाकाळकर सभागृह ते सोनझरीनगर फायर स्टोशन पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव मे. आर.एम. दयारमानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 25 टक्के कमी दराची रु. 14,81,250/– राशीची मंजूर निविदेनुसार पद क्र. (जुना 482) नविन पद क्र. 682 अंतर्गत रु. 11,94,250/– चे प्रावधान उपलब्ध करुन देण्याचा व कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र. 682 च्या जुन्या देण्यातुन रु. 11,94,250/– तरतुद उपलब्ध करुन देण्यात येते, या अटीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 110 :– वॉर्ड क्र. 128, येथे हनुमान मंदिर सोनझरीनगर चौक ते हुसैन बाबा दरगाह पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे

कामास्तव मे. आर.एम. दयारमानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 25 टक्के कमी दराची रु. 11,05,500/— राशीची मंजूर निविदेनुसार उर्वरित कामास्तव पद क्र. (जुना 482) नविन पद क्र. 682 अंतर्गत रु. 8,77,500/— राशीचे प्रावधान उपलब्ध करुन देण्याचा व कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र. 682 च्या जुन्या देण्यातुन रु. 8,77,500/— तरतुद उपलब्ध करुन देण्यात येते, या अटीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 111</u> :— छावणी 'वाय' पॉईन्ट ते पागलखाना चौक ते मानकापूर — रिंग रोड चौक पर्यंतच्या रस्त्यावर रस्ता दुभाजक उभारण्याकरीता एकूण रुपये 38,12,000/— च्या प्राकलनास व प्रावधानास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उपरोक्त काम पद क्र. 692 अंतर्गत करण्याच्या अटीवर विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 112</u> :— प्रतापनगर चौक ते माटे चौक पर्यंतच्या सिमेन्ट रोड वर रस्ता दुभाजक उभारण्या करीता एकूण रुपये 11,41,000/— च्या प्राकलनास व प्रावधानास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उपरोक्त काम पद क्र. 692 अंतर्गत करण्याच्या अटीवर विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 113</u> :— नागपूर शहरातील पिण्याच्या पाण्यात Residual Chlorine व गुणवत्ता राखण्याकरिता Monitoring करण्याचे वार्षिक कामाकरिता रु. 46,81,500/— चे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच या कामाची निकड लक्षांत घेता, चालू कंत्राटास दोन महिन्याची मुदतवाढ देण्यास व त्याअनुषंगाने येणाऱ्या अतिरिक्त रु. 6,56,700/— चे खर्चास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तीन महिन्याच्या मुदत वाढ देण्याच्या अटीसह या विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 114</u> :— शहरातील विविध जलकुंभावर बसविण्यात आलेल्या Electro Chlorinator व Deiesel Generating Set चे Operation & Maintenance चे कामाकरिता वार्षिक दर करार व एजेन्सी निश्चित करण्याचे कामाकरिता ई—निविदा पध्दतीने निवीदा बोलविण्यात आल्या असता प्राप्त निविदाकारांपैकी निम्नतम निविदाकार M/s. Nagpur Aquatech Pvt. Ltd. यांची एक वर्षाकरिता रु. 83,66,675/— खर्चाची प्राकलनीय दराची सुधारित निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 115</u> :— जूने गोरेवाडा 16 MLD क्षमतेच्या जलशुध्दिकरण केन्द्र व पंपींग मशीनरीचे वार्षिक संचलन, सुस्थिती व दुरुस्तीचे कामाचे

रु. 27,27,576/– चे प्राकलन मंजुरीचा व या कामाकरीता निविदा बोलविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 116</u> :– वार्ड क्र. 4 जुना कामठी, कळमना रोड, नागपूर येथील श्री. अभिषेक भालचंन्द्र जोशी यांचे घर क्र. 11764/एच यांची इमारत नागपूर महानगरपालिकेच्या शाळा भररविण्यासाठी किरायाने घेण्यात आल्या. त्याप्रमाणे त्या इमारती मध्ये 1) कळमना हिंदी प्राथमिक शाळा 2) वांजरी हिंदी उच्च प्राथमिक शाळा व 3) कळमना मराठी प्राथमिक शाळा या शाळांचा किराया तात्पुरता देण्यात येत आहे. कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद यांच्या मार्फत उपरोक्त शाळा भरत असलेल्या इमारतीचा किराया निश्चित करुन रेंट सर्टिफिकेट प्राप्त झालेले असल्यामुळे नवीन मासिक किराया रु. 24,270/– आकारण्यात आलेले आहे. सदर भाडयाचा कालावधी दि. 01.04.2008 ते 31.03.2013 पर्यंत आहे.

या अनुषंगाने दि. 01.04.2008 पासून घरमालकास भाडे दयावे, किंवा मा. स्थायी समिती यांनी प्रस्ताव मंजूर केलेल्या दिनांकापासून भाडे देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सोबत झालेल्या किरायदाराच्या करारनाम्याच्या अटी व शर्ती नुसार किराया देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 117</u> :– पेंच टप्पा – 3 वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत 1200 मि.मी. व्यासाची लोखंडी गुरुत्ववाहीनी व उर्ध्वजलवाहीनी चे कामाकरिता रु. 6.70 कोटी ची निविदा स्थायी समिती ठराव क्र. 121 दिनांक 03.02. 2001 नुसार मंजूर करण्यात आली होती.

कामाची प्रत्यक्ष सुरुवात केली असता काही अतिरीक्त कामे करण्यात आले. स्थायी समिती ठराव क्र. 456 दिनांक 08.09.2003 नुसार रु. 70903419.00 चे अंतरिम सुधारीत प्राकलनास मंजूरी प्रदान करण्यात आली होती.

कामे पूर्ण झाल्यापर्यंत करण्यात आलेले अतिरिक्त कामानुसार एकूण रु. 8,29,43,237.00 चे सुधारित प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचे प्रश्न समितीने विचारात घेऊन नवीन मा. निगम आयुक्तांचे अभिमत घेऊन, स्थायी समिती समोर ठेवण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 118</u> :– वार्ड क्र. 42, ॲड सखारामपंत मेश्राम उद्यान, मंगळवारी येथे उद्यानाच्या नविनीकरणाकरिता आवश्यक हॉर्टीकल्चरल कामाकरीता निविदा बोलाविल्या असता प्राप्त निविदांपैकी मे. श्री.हिमालय प्लान्टेशन यांची रुपये 15,58,331/– ची प्राकलनीय दरापेक्षा 39.60 प्रतिशत कमी दराची निम्नतम निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 119</u> :– राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि. 19

जून 2010 चे आदेशान्वये नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 चे कलम 13 (ब) याव्दारे व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 चे कलम 79 (ब) मधील तरतुदीनुसार मतदान यंत्रे खरेदी व मतदान यंत्रे सुस्थिती व दुरुस्ती करण्याकरिता राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र राज्य यांचेकडे अंशदान देण्याकरिता रुपये 18,00,000/– च्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 120</u> :– नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 कलम–58 (द–क) तरतुदीच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिके मार्फत कोणतेही सार्वजनिक स्वागत समारंभ व करमणुकीचे कार्यक्रम यासाठी अंशदान देण्याबाबत कार्यवाही करण्याची नोंद घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विषयाचा संपूर्ण अभ्यास करुन अहवाल म.न.पा. सभागृहास सादर करण्याचे संपूर्ण अधिकार अध्यक्ष, स्थायी समिती यांना देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 121</u> :– नागपूर महानगरपालिकेच्या (1) मोक्षधाम , (2) अंबाझरी , (3) गंगाबाई व (4) वैशालीनगर येथील दहन घाटावर डिझल शवदाहीन्या असुन डिझल शवदाहीनीचे रुपांतर L.P.G. मध्ये केल्यास प्रदुषणास कमी करण्यास तसेच खर्चात कपात होण्यास मदत होईल. सध्या मोक्षधाम व अंबाझरी येथील डिझल शवदाहीण्याच रुपांतर L.P.G. मध्ये रुपांतर केल्यानंतर शवदाहीनीची चाचणी घेणे विभागाच्या कर्मचाऱ्यांना परिचालनाचे प्रशिक्षण देणे व कार्यान्वीत करणे व नमुद अटी शर्ती नुसार प्रती संच रु. 11,56,500/– या प्रमाणे दोन संचासाठी रु. 23,13,000/– खर्च अपेक्षित असुन त्यासाठी निविदा मागविण्याचा तसेच खर्च आय–व्यय पद क्र. 343 मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 122</u> :– अंबाझरी उद्यानाची देखभाल तसेच नौकाविहार, करमणूकीची साधने, (Amusement Rides) उपहारगृहाची (Food Plaza) व्यवस्था व संचालनाकरीता व्यक्ती व व्यावसायिक प्रतिष्ठाने इत्यादीमधून योग्य एजन्सी निश्चीत करण्याकरीता रुचीदर्शक प्रस्ताव (Expression of Interest) खालील ठळक तत्वांवर मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. उद्यानाची प्रवेश फी स्विकारण्याचा हक्क एजन्सीला राहिल.
2. सदर कंत्राट प्रथमतः दोन वर्षाकरीता देण्यात येईल. त्यानंतर पुढील एक वर्षाकरीता कंत्राटाचा कालावधी वाढविण्याचा विचार करण्यात येईल.
3. रुचीदर्शक प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर योग्य एजन्सीजकडून वित्तिय देकार मागविण्यात येईल.

**ठराव क्रमांक 123** :— महानगरपालिकेच्या 31 उद्यानाची देखभाल लोकसहभागातून करण्याकरीता व्यक्ती, सेवाभावी संस्था, व्यावसायिक प्रतिष्ठाने इत्यांदीमधून योग्य एजन्सी निश्चीत करण्याकरिता रुचीदर्शक प्रस्ताव (Expression of Interest) खालील ठळक तत्वावर मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. उद्यानांच्या क्षेत्रफळानूसार उद्यानांची अ, ब व क या प्रमाणे वर्गवारी केली आहे. व त्यानुसार 'अ' श्रेणी 5 वर्षाकरीता, 'ब' व 'क' 3 वर्षाकरिता देण्याचे प्रस्तावित आहे.
2. अ आणि ब श्रेणीतील उद्यानांची विद्युत व पाण्याची देयके एजन्सीला अदा करावी लागेल.
3. उद्यानात जाहिरातीचे, खाद्यपदार्थ विक्रीचे तसेच करमणूकीचे साधने बसवून त्यांच्या संचालनाचे हक्क एजन्सीला देण्यात येईल.
4. फक्त अ आणि ब श्रेणींच्या उद्यानांकरीता योग्य एजन्सीकडून वित्तिय देकार मागविण्यात येईल.

अपर आयुक्त :— आज मा.अध्यक्ष स्थायी समिती यांचा वाढदिवस असल्यामुळे कार्यालयाकडुन मी त्यांचे अभिष्टचिंतन करतो व त्यांची उतरोत्तर प्रगती व्हावी अशी शुभकामना करतो.

**ठराव क्रमांक 124** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर

# – ठरावाचे प्रारुप –

महानगरपालिकेत कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी अपंग कर्मचाऱ्यांना शासन निर्णय परिपत्रक क्र. अपंग–1008 / प्र.क्र. 111 / 08 / 16–अ, दिनांक 08.09.2008 अन्वये राज्य शासनाच्या सेवेतील गट–क व गट–ड मधील अंध / अल्पदृष्टी, कर्णबधीर, अस्तीव्यंग किंवा मेंदूचा पक्षघात या अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत प्रत्येकी 1 टक्के या प्रमाणे एकूण 3 टक्के आरक्षण लागू करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

टिप :– गट–क व गट–ड या करिता (Identi Fide) पोस्ट चे प्रमाण तयार करण्यांत आले असून शासन निर्णयाची प्रत व सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

सहाय्यक आयुक्त (स्थापना)
सामान्य प्रशासन विभाग,
महानगरपालिका, नागपूर.